Thana
Raana.

Ranajiol



# डुलू डुलू

ना. गो. शुक्ल

★

किंमत रु. १-१२ नये पैसे

IRBK-0107603

जगताप-कारले प्रकाशन



डुलू डुलू
खेळं पीठ
माझ्या घरांत
नांव काय तुझं ?
हातांत माझ्या जादू आली
पाटी बघ बाई
माझा कोंबडा
शाळेमध्यें उंदीर पडला
शहाणे कोण ?
छोटू गोटू
मीच सुंदर
ठार मारलें नागोबाला
चिमणीची दिवाळी
म्हातारीची शेती होती
लग्नाला चला
चिट्टू बिट्टू



प्रकाशक : स. आ. जगताप,
जगताप-कारले प्रकाशन, १९२ शुक्रवार, पुणें २.

मुद्रक : मा. र. कारले,
जनसेवा मुद्रणालय, १९२ शुक्रवार, पुणें २.

चित्रकार : अनंत सालकर

# डुलू डुलू



डुलू डुलू डूल डोले तुझ्या कानांत
चमचम चमकते चमकी नाकांत
छुम छुम छुमकती चाळ पायांत
किण किण कांकणांची तुझ्या हातांत–१

२६२०१
बालवाङ्मय
०१२
११।५।८८



झगमग झळाळतो झगा अंगांत
रिबिनीची झुळझुळ छोट्या वेणींत
लुटु लुटु चालते तूं कशी झोकांत
दुडु दुडु पळते तूं कशी जोरांत–२



चकाकत्या चांदण्यांची झग्यास खडी
पुनवेचा चंद्र आला बघा कपाळीं
खेळण्याचा बाई तुला नाहीं कंटाळा
गळ्यामध्यें गळा घाली गोपाळ-मेळा–३



या ग मुलींनो लवकर या ! खेळंपीठ खेळूं या

चहा आणा तुमचा
पाणी आहे आमचं
साखर आणा तुमची
भांडं देऊं आमचं
चूल आहे आमची
पण दूध आणा तुमचं

आधण चढवा चुलीवर
चहा करा हंडाभर
आम्ही पितों पोटभर
तुम्ही प्या घोटभर



# खेळंपीठ

या ग मुलींनो लवकर या ! खेळंपीठ खेळूं या

पाट टाका तुम्ही
वर बसतों आम्ही
ताटं वाढा तुम्ही
जेवायला बसतों आम्ही
ढेकर देतों आम्ही
मग पाणी प्या तुम्ही
आतां जेवण झालें
हात पाय दमले
आम्हांला द्या विडा
तुम्ही तेवढीं उष्टीं काढा





ही माझी आई
काय तिची घाई
सदाकदा कावते
गोड पापा घेते

ही माझी मावशी
आहे फार हौशी
कधीमधीं येते
खूप खाऊ देते





हा माझा दादा
हंसतो खदाखदा
आपण खोड्या करतो
नांव माझं घेतो

ही माझी ताई
तिला कांहीं येत नाहीं
तेंच तेंच विचारते
नांव सांग म्हणते





# माझ्या घरांत

हे बाबा आमचे
डोळे मोठे त्यांचे
आरडाओरडा करतात
आम्हांला गप्प बसवतात

माझे बाबा, माझी आई
माझा दादा, माझी ताई
घरांत माझ्या राहातात
मला फारच आवडतात





हा आमचा बाळ
पायांत त्याच्या चाळ
एक पाय नाचवतो
छुमु छुमु वाजवतो



नांव काय तुझं ?

आई म्हणते चिचुंद्री
बाबा म्हणतात उंदरी
माझं नांव सुंदरी



नांव काय तुझं ?

आई म्हणते लाडोबा
बाबा म्हणतात दोडोबा
माझं नांव बाळोबा



नांव काय तुझं ?

आई म्हणते साखरआंबा
बाबा म्हणतात गुळांबा
माझं नांव जगदंबा



# नांव काय तुझं ?



नांव काय तुझं ?

आई म्हणते गडू

बाबा म्हणतात लाडू

माझं नांव भावडू

नांव काय तुझं ?

आई म्हणते छबू

बाबा म्हणतात ढबू

माझं नांव मधू



आमचीं नांवें एकशें एक

तुम्ही ठेवा आणखी एक

हातांत माझ्या जादू आली, पहा कशी ती गंमत झाली,



उडत चालला कसा कावळा
फारच दिसतो काळा काळा १



मासा केला पाण्यामधला
कल्ले मारत पुढें चालला २




फूल उमललें छोट्या कळीचें
सुरेख सुंदर गमतीचें ३

भूक लागली हरणीला
कोवळें कोवळें गवत घाला ४

# हातांत माझ्या जादू आली





काय पाहिजे बकरीला
घाला घाला हिरवा पाला ५

चटई केली बोटांची
बैठक पसरा तुम्ही याची ६

हें बघ घरटें कोणाचें
इवल्या इवल्या चिमणीचें ७




सांगा बोटें कशास जुळली
तुमची आमची सोबत जमली ८



आई ग आई,
पाटी बघ बाई
मजा मजा काढली
पाटी बघ भरली

चांदोमामा आजोबा झाला
कमरेमध्यें किती वांकला
काठी टेकीत टेकीत येतो
चटकचांदण्या बोलावतो

पाण्यामधले मासे बघ हे
लाडूसाठीं भांडतात हे
खाऊसाठीं कशास झगडा
वाटून घ्या ना भांडण सोडा







# छोटू गोटू

किती हाका मारल्या
किती ओरडा केला
पण वारा कांहीं ऐकेना
छोटू परत येईना

फुगे चालले वाहात
आणि अडकले झाडांत
छोटूला मिळाली फांदी
घट्ट धरून ठेवली

हालतां येईना छोटूला
चालतां येईना छोटूला
छोटू लागला रडायला
गोटू लागला रडायला
तेथें आली घार

ती म्हणाली रडतोस फार
छोटू म्हणाला घारीला

माझा भाऊ माळावर
मी अडकलो झाडावर
मला ने माळावर
तूं रहा झाडावर

उचलून धरलें घारीनें
आणि चालली वेगानें
छोटूस माळावर आणलें
गोटूजवळ सोडून दिलें

गोटूस त्यानें मिठी मारली
छोटू गोटूची भेट झाली
आनंद झाला घारीला
मजा वाटली आम्हांला



हत्ती गेंडा यांची जोडी
जमली होती झाडाखालीं
ऐका ऐका गमतीचा
वाद चालला दोघांचा.

हत्ती म्हणतो, मी तर सुंदर
गेंडा म्हणतो, मीहि सुंदर
उंट चालला बाजूंनीं
हाक मारली दोघांनीं.
हत्ती म्हणतो उंटाला—
" ये ये भांडण तोडायला ! "

झाडाखालीं उंट आला
वाद तोडण्या तयार झाला.

हत्ती म्हणतो—
" अगडबंब हें माझें अंग
खुलतो काळा काळा रंग
सोंड लांबडी सदा हालते :
इकडे तिकडे झुलत राहते ! "
गेंडा म्हणतो—
" जाड कातडी कोट घालतों
डुलत डुलत मी सदा चालतों
झोकदार हें शिंग मजेचें
डोक्यावरती शोभा देतें ! "
उंट म्हणतो—
" उगाच भांडण तुम्ही करतां
वादावादी फुका भांडतां
तुम्ही दोघे नाहीं सुंदर
तुमच्याहुन मी आहे सुंदर ! "

# मीच सुंदर

राग भडकला हत्तीचा
राग भडकला गेंड्याचा
मान ओढली हत्तीनें
पाठ सडकली गेंड्यानें.

प्रश्न एक तर उत्तर दुसरें
हत्ती गेंडा यांना दिलें
शिक्षा उंटाला झाली
पाठ वांकली, मान लांबली.



बेडकीला झालें बेडुकलें
टुण्टुण् उड्या मारूं लागलें
मजा वाटली बेडकीला
खुदुखुदु लागली हंसायला—१


बाळ विचारी आईला
जाऊं का बाहेर हिंडायला
खूप खूप मी खेळीन
गंमत जंमत करीन—२

आई बोलली बाळाला
नको जाऊं तूं हिंडायला
खोडी कुणाची करशील
आणि तुला ते मारतील—३

आई लागली कामाला
बाळ लागलें खेळायला
डोळा चुकवुन आईचा
रस्ता धरला बागेचा—४

बागेमध्यें नागोबा
उपाशिं पोटीं बसलेला
बघून बेडाकिच्या बाळाला
लागला जिभल्या चाटायला—५

हळूच जवळी येऊनी
पटकन् तोंडांत पकडूनी
गिळूं लागला बाळाला
'आई, आई' बाळ बोलला—६





# ठार मारलें नागोबाला

कामें संपलीं आईचीं
हाक ऐकली बाळाची
गेली धाउनि बागेंत
बाळ पाहिलें तोंडांत

नागोबावर उडी मारली
कचकन् त्याची मान चावली
नागोबाची पक्कड सुटली
बेडुकल्याची सुटका झाली

ठार मारलें नागोबाला
हातीं धरलें बेडुकल्याला
चाले बेडकी घराला
आवडे आई बाळाला





चिमणी गेली दुसऱ्या दारीं
धनीण आली बाहेरी
ती म्हणाली चिमणीला
" चट्टामट्टा आतां झाला
बशा ताटल्या आतां धुतल्या "

चिमणी म्हणाली धनिणीला,
" खोटें सांगतेस तूं मला
आतां होशील तूं प्राणी
बशाच धू तूं घेउन पाणी "

दोन बशा हातून सुटल्या
एक चिकटली डोक्याला
एक चिकटली पायाला
धनीण लागली धडपडायला

धनिणीचें कासव झालें
पाण्यामध्यें पोहूं लागलें.
पुढें चालली चिमणाबाई
तिला भेटली मैनाताई

बसली होती ओट्यावरती
लाडू-करंज्या खात होती.

आली दिवाळी आली दिवाळी
करंज्या लाडू कडबोळीं
गरीब बिचारी चिमणी
काय असणार तिच्या घरीं ?
ती चालली दारोदारीं
मिळेल खाऊ कुणा घरीं !

ती आली एका दारीं
मालकीण आली बाहेरी
ती म्हणे चिमणीला—
" तूं आहेस भिकारी
हो चालती पुढच्या दारीं
कुत्रा सोडीन तुझ्यावरी "

चिमणी म्हणाली,
" तूंच हो तर कुत्री काळी "
मालकीण कुत्री झाली
भो भो भुंकूं लागली

# चिमणीची दिवाळी

तिला बोलली मैनाताई
“ चिमणे चिमणे, ये ग ये
लाडू खाऊ घे ग घे
रडूं नको तूं सांग मला
कोण बोललें काय तुला ”

चिमणी-मैना एका ताटीं
लाडू-करंज्या खात होतीं
मजा वाटली चिमणीला
काय म्हणाली मैनेला

“ मिळेल तुजला सुंदर नवरा
हिरव्या हिरव्या पंखांचा
लाल लाल तोंडाचा
विठू विठू बोलणारा
गोड फळें खाणारा,

मनाबाई मैना झाली
राघू घेउन उडून गेली.
हिरव्या हिरव्या झाडावरतीं
राघू-मैना खेळ खेळती





म्हातारीची शेती होती । शेतावर ती रहात होती

म्हातारीची शेती होती
शेतावरती रहात होती—॥ धृ ॥

शेतावरतीं कुत्रीं होतीं
भो भो भो भो ओरड करती
इकडे भो भो तिकडे भो भो
जिकडे तिकडे भो भो भो भो
आरडतीं ओरडतीं
म्हातारीची शेती होती —१



शेतावरतीं मांजरें होतीं
म्यांव् म्यांव् म्यांव् म्यांव् ओरड करती
इकडे म्यांव् म्यांव् तिकडे म्यांव् म्यांव्
जिकडे तिकडे म्यांव् म्यांव् म्यांव् म्यांव्
आरडतीं ओरडतीं
म्हातारीची शेती होती —२

शेतावरतीं बदकें होतीं.
क्वॅक् क्वॅक् क्वॅक् क्वॅक् ओरड करतीं
इकडे क्वॅक् क्वॅक्, तिकडे क्वॅक् क्वॅक्
जिकडे तिकडे क्वॅक् क्वॅक् क्वॅक् क्वॅक्
आरडतीं ओरडतीं
म्हातारीची शेती होती —३



# म्हातारीची शेती होती



शेतावरतीं मेंढरें होतीं
बें बें बें बें ओरड करती
इकडे बें बें तिकडे बें बें
जिकडे तिकडे बें बें बें बें
आरडतीं ओरडतीं
म्हातारीची शेती होती





शेतावरतीं कुत्रीं होतीं
शेतावरतीं मांजरें होतीं
शेतावरतीं बदकें होतीं
शेतावरतीं मेंढरें होतीं
भो भो भो भो ओरड करती
म्यांव म्यांव म्यांव म्यांव ओरड करती
क्वॅक क्वॅक क्वॅक क्वॅक ओरड करती
बें बें बें बें ओरड करती
इकडे भो भो तिकडे भो भो
इकडे म्यांव म्यांव तिकडे म्यांव म्यांव
इकडे क्वॅक क्वॅक तिकडे क्वॅक क्वॅक
इकडे बें बें तिकडे बें बें
जिकडे तिकडे भो भो भो भो
म्यांव म्यांव म्यांव म्यांव
क्वॅक क्वॅक क्वॅक क्वॅक
बें बें बें बें आरडतीं ओरडतीं



लग्नाला चला ! तुम्ही लग्नाला चला !
नलुताई मालुताई, लग्नाला चला
लिलूची बाहुली
सुलूचा बाहुला
नटली सजली
लग्नाला आली
नवरीला पाय नाहीं, नवऱ्याला हात नाहीं
बघायला चला, तुम्ही लग्नाला चला !
धम्मक लाडू
चापट पोळ्या
मुरडीचे कानोले
लोण्याच्या जिलब्या
तयार केल्या, ताट पाट मांडला
खायला चला—तुम्ही लग्नाला चला



२८२८१
बाडनाङ्मय
८१२
११/५/८८
वाचनालय शाखा

# लग्नाला चला

वाचनालय शाखा.




डब्याचा ताशा
फुंकणीचा बाजा
केळीच्या पिपाण्या
पिपाचा ढोल

वरातीला आणला, वाजवायला चला
लग्नाला चला, तुम्ही लग्नाला चला

भेंडाची गाडी
कागदाचं विमान
किल्लीची मोटार
बोकडाची बग्गी

उभी केली दारांत, बसायला चला
लग्नाला चला, तुम्ही लग्नाला चला





# चिट्टू बिट्टू

चिट्टू बिट्टू अंगणांतुनी रस्त्यांत आले
रस्त्यावरती इकडे तिकडे त्यांनीं पाहिलें

मोटारगाडी पों पों आली
सायकल ट्रिंग ट्रिंग करीत आली
खटारगाडी खड् खड् आली
घोडागाडी टाक टुक आली

पों पों, ट्रिंग ट्रिंग
खड् खड्, टाक् टुक् आवाज आले
रस्त्यावरतीं चोंहींकडे आवाज झाले
चिट्टू बिट्टू अंगणातुनी रस्त्यांत आले



रिक्शावाला टरार् टर् टर्
टांगेवाला चकाक् चक्चक्
बग्गीवाला टकाक् टक् टक्
गाडीवाला खडाड् खड् खड

टर् टर्, चक् चक्
टक् टक्, खड् खड्-आवाज आले
रस्त्यावरतीं चोंहींकडे आवाज आले
चिट्टू बिट्टू अंगणांतुनी रस्त्यांत आले

२२२०१
बालवाङ्मय
०१२
११/०२८
IRBK-0107603
IRBK-0107603

पाल बतीस